वाचले- १) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडील दि. १४ मार्च २०२० रोजीची अधिसूचनेनुसार प्रसिध्द केलेले "महाराष्ट्र कोवीड१९ उपाययोजना नियमावली २०२०"

२) मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जिल्हाधिकारी कार्यालय पुणे यांचेकडील पत्र क्र. कक्ष/कोरोना विषाणू/६३९/२०२० पुणे दि.२२/०४/२०२० रोजीचा आदेश

३) मा. सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दि. १९ मे २०२० चे नोटीफिकेशन

४) कोरोना २०२० सी.आर ९७/आरो-५, सार्वजनिक आरोग्य विभाग नवी मंत्रालय, मुंबई ४०००१ दि. २१ मे २०२० ची अधिसुचना

५) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडील पत्र जा.क्र.डिझास्टर/ डब्ल्यु.एस./२८८/२०२० दि. २५/५/२०२०

६) कोविड- १९ बाबत उपाययोजना करणेबाबत इकडील आदेश क्र. वैद्य/८/कावि/२७५६/२०२० दिनांक १/६/२०२०

७) Public Health Department, Mantralaya, Mumbai यांचेकडील अधिसुचना क्र. CORONA-2020/C.R.97/Aro-5 dated 15-12-2020 to till 31-5-2021

८) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि. / /२०२१ रोजीचा मंजूर प्रस्ताव

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
वैद्यकिय मुख्य कार्यालय
क्र. वैद्य/८/कावि/५२१/२०२१
दि. १०-०४-२०२१

**विषय - खाजगी रुग्णालयामध्ये कार्यरत अधिकारी तसेच कर्मचारी यांच्यासह उपकरणे ,बेड्स, लॉण्ड्री या सेवा कोरोना बाधित रुग्णांच्या सेवेकरिता** DCHC या कॅटेगरीमध्ये **घोषीत करणेबाबत...**

आदेश

महाराष्ट्र राज्यात सध्या कोरोना विषाणू ची साथ मोठया प्रमाणात आढळुन येत असल्याने पिंपरी चिंचवड शहरात साथीचा प्रादुर्भाव रोखण्याच्या अनुषंगाने संदर्भ क्र. १ ते ४ ची अंमलबजावणी सुरु झालेली आहे.

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणुने (कोविड १९) उदभवणा-या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी महाराष्ट्र (कोविड १९) उपाययोजना नियम २०२० यातील नियम ३ नुसार पिं. चिं. मनपा भागात आयुक्त, महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी यांना सक्षम प्राधिकारी म्हणुन घोषीत केले आहे.

मनपा कार्यक्षेत्रात कोविड-१९ रुग्णांची संख्या वाढत असल्याने आपण आपले खाजगी रुग्णालयामध्ये कोविड-१९ रुग्ण भरती करणेकामी विनंती अर्ज सादर केलेले आहेत. या अनुषंगाने Directorate of health services, Pune Office यांचेकडील पत्र क्र. DHS/Covid-19/Desk-58/assessment of CAT-II/13905-14027/2020 दि. ८/५/२०२० या संदर्भीय पत्रान्वये सदर रुग्णांलयाची कोविड रुग्ण भरती करणेकामी तपासणी (Assesment) वैद्यकिय विभागामार्फत पत्र निर्गत करुन तपासणी करुन घेणेत आलेली आहे.

तरी मनपा कार्यक्षेत्रातील कोविड-१९ वर बाधित रुग्णांच्या सेवेकरिता आपले रुग्णालय हे उपरोक्त नमुद संदर्भीय पत्रांनुसार आपले रुग्णालयामधील सर्व कार्यरत अधिकारी तसेच कर्मचारी यांच्यासह उपकरणे, बेड्स, लॉण्ड्री इत्यादी सेवा सहित डेडिकेटेड कोविड हेल्थ केअर सेंटर म्हणुन घोषीत करीत आहे. आपले रुग्णालयात कोविड-१९ रुग्ण दाखल करुन उपचार करणे अपेक्षीत आहे.

<u>याकरिता खालीलप्रमाणे खालीलप्रमाणे अटी शर्तीस अधिन राहुन आपण उपाययोजना कराव्यात.</u>

1. आपले खाजगी रुग्णालयातील एकुण सर्व ऑपरेशनल बेड्स (General Bed, ICU Bed, O2 attached Bed, Ventilaor Bed) हे कोविड-१९ रुग्णांवर उपचार करणेकरिता नियंत्रित करण्यात येत आहेत.
2. मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग यांचेकडील पत्र जा.क्र.डिझास्टर/ डब्ल्यु.एस./२८८/२०२० दि. २५/५/२०२० अन्वये आजाराबाबतच्या पॅकेजमध्ये रुग्णालयातील उपचार व डॉक्टरांच्या तपासणी शुल्क एकत्रपणे असतील याबाबत कोणत्याही डॉक्टरांनी कोविड -१९ रुग्णांवर उपचार करणेस नकार दिल्यास त्या संबधित डॉक्टर यांचेवर केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कायदयान्वये कारवाई करुन MMC नोंदणी रद्द करण्याची कारवाई करणेस पात्र राहतील.
3. आपले खाजगी रुग्णालयातील कार्यरत डॉक्टर्स व नर्सेस व इतर कर्मचारी रुग्णालयातील अत्यावश्यक सेवेसाठी कार्यरत राहतील. जे डॉक्टर्स, नर्सेस व इतर कर्मचारी अत्यावश्यक सेवेत कोविड -१९ रुग्णांवर उपचार करणेस नकार देतील

तसेच कामावर हजर राहणार नाहीत व आपले कर्तव्य बजावणेत कसूर करतील अशा सर्व व्यक्तींवर केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ चे कायदयान्वये कारवाई करणेस पात्र राहतील. सबब मेस्मा कायदयाअंतर्गत डॉक्टर्स व नर्सेस यांना त्यांची जबाबदारी टाळता येणार नाही. तसेच खाजगी रुग्णालयातील पॅरामेडिकल व इतर कर्मचारी देखील मेस्मा कायदयाअंतर्गत कारवाईस पात्र राहतील.

4. आपले खाजगी रुग्णालयातील रुग्णवाहीका कोविड १९ रुग्णांच्या वाहतुकीसाठी कार्यान्वीत ठेवणे बंधनकारक असतील.
5. सर्व खाजगी रुग्णालयांमध्ये सार्वजनिक स्वच्छता ठेवणे मेस्मा कायदयाअंतर्गत बंधनकारक आहे
6. आपले रुग्णालयात दाखल करणेत येणा-या रुग्णांबाबतचा अहवाल हा राज्य शासनाने दिलेल्या विहित नमुन्यात Covid19@pcmcindia.gov.inया ईमेलवर दैनंदिन स्वरुपात सादर करणे बंधनकारक असेल तसेच पिंपरी चिंचवड Dashboardवर सर्व नोंदी अदयावत ठेवणे बंधनकारक असेल) .Covid-19 DASHBOARD Link - http://103.224.247.133:8080/Covid19Dashboard/
7. कोविड .मा रुग्णांचे उपचाराकामी आपले रुग्णालयामार्फत बिल आकारतांना १९-सार्वजनिक आरोग्य विभागमहाराष्ट्र , चे नोटीफिकेशन उल्लंघन होणार नाही २०२०मे १९ .दि 5-C.R.97/Aro/2020-No. CORONA शासन यांचेकडील .याची दक्षता घ्यावी
8. कोविड-१९ रुग्णांच्या उपचाराचे बिल, रुग्णांची उपचाराविषयी तक्रारी प्राप्त झाल्यास रुग्णांकडुन कायदेशीर कारवाई झाल्यास पिंपरी चिंचवड महानगरपालिका जबाबदार राहणार नाही, त्याची सर्वस्वी जबाबदारी रुग्णालय प्रशासनाची राहील.
9. आपले खाजगी रुग्णालयात कोविड रुग्णांना देणेत येणाया उपचारात्मक सेवा त्या रुग्-णालयामार्फत महात्मा फुले जन आरोग्य योजना (MJPJY) अंतर्गत जर रुग्णालय योजनेकरिता रजिस्टर्ड असेल तर देऊ शकतात .
10. आपले खाजगी रुग्णालयात कोविड रुग्णांना उपचार दिल्यानंतर कोणत्याही प्रकारची बिले अथवा देयकेमनपामार्फत ) (या धन्वंतरी योजनेव्यतिरिक्त-चालविणेत येणामनपाकडे अदायगीकामी पाठविणेत येऊ नयेत .
11. कोविड -१९ अंतर्गत निर्माण होणारे बायो मेडिकल वेस्ट बाबत राज्य व केंद्रशासनाने वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे जाहीर केलेली आहेत, त्या नुसार सर्व सूचनांचे पालन करावे. तसेच कोविड -१९ अंतर्गत निर्माण होणाऱ्या बायो मेडिकल वेस्ट गोळा करणेकामी मे. पास्को एन्व्हायरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. लि. यांच्यामार्फत स्वतंत्र वाहनांची व्यवस्था करणेत आलेली आहे, त्यामुळे सदर बायो मेडिकल वेस्ट नेहमीच्या गाडीकडे देऊ नये. कोविड -१९ अंतर्गत निर्माण होणाऱ्या बायो मेडिकल वेस्ट मधून कोविड -१९ चा प्रसार होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी.
12. कोविड-१९ चा जैव वैद्यकिय कचरा निर्मुलनासाठी स्वंत्रपणे वैद्यकिय विभागामार्फत मान्यताप्राप्त दरानुसार बिल पाठविणेत येईल.सदर बिलाचा भरणा बिल मिळालेपासुन सात दिवसांचे आत भरणा करावा लागेल .
13. केंद्रीय प्रदुषण मंडळ यांचे Covid19BMW हे मोबाईल एप डाऊनलोड करुन त्यामध्ये नोंदणी करणे शासनाने मार्गदर्शक सुचनांनुसार बंधनकारक आहे, तसेच दररोज कोविड-१९ चा जैव वैद्यकीय कचरा जमा केलेनंतर सदर App मध्ये कचऱ्याचे नोंदणी करणे आवश्यक आहे.
14. प्रपत्र अ/ Annexure मध्ये नमुद केलेल्या हॉस्पिटल यांनी आदेश मिळाल्यावर त्वरीत वार रुम यांचेकडे संपर्क करुन हॉस्पिटल Register केल्यानंतरच कोविड पेशंट ॲडमिट करुन घ्यावेत.
15. सदर आदेशाची प्रत मिळाल्यानंतर मे. पास्को एन्व्हायरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. लि. यांच्याशी संपर्क साधून कोविड -१९ अंतर्गत निर्माण होणाऱ्या बायो मेडिकल वेस्ट गोळा करणाऱ्या वाहनाची माहिती घेण्यात यावी तसेच COVID19BWM या मोबाईल ॲप मध्ये नोंदणी करून घेण्यासाठी काही अडचण असल्यास मे. पास्को एन्व्हायरॉन्मेंटल सोल्युशन्स प्रा. लि. यांच्या कडून मार्गदर्शन घेण्यात यावे.

10/4

(डॉ. लक्ष्मण गोफणे)
सहा. आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८

प्रति,

------------------------------------

------------------------------------

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**

**वैद्यकिय मुख्य कार्यालय**

प्रपत्र "अ"

| Sr. No. | Hospital Name | Registered Total Bed | Beds Without O2 | ICU Bed | With O2 Attached Bed | ICU Beds Ventilator |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Chavan Hospital, Plot No. 54, Vastu Udyog, Pimpri Pune 18. | 50 | 3 | 10 | 35 | 2 |
| 2 | Dr. D.Y.Patil collage of Ayurved Hospital & Research Center, Pimpri Pune 18 | 272 | 200 | 21 | 50 | 1 |
| 3 | Star Hospital | 25 | 16 | 4 | 4 | 1 |
| **Total** | | 347 | **219** | **35** | **89** | **4** |

10/4

(डॉ. लक्ष्मण गोफणे)
सहा. आरोग्य वैद्यकिय अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११०१८